

जळगाव : चाळीसगाव तालुक्यात उन्हाळी बागायती बाजरीची मोठ्या प्रमाणात लागवड होते.

स्वाभिमानी विचार प्रति, Book-Post

RNI No. - MAH/MAR/2005/16213 Rgd. No.L2/17/RNP/K.L.P/234/12-14

वर्ष ७ अंक ११ १ मे २०१२ किंमत ५ रुपये पाने २०

स्वाभिमानी विचार

संपादक : खासदार राजू शेट्टी

# कांद्यासाठी विधानभवनाच्या दारात !



विधानभवन, मुंबई : कांदा, बेदाणा व दूधप्रश्नी आंदोलन करताना खासदार राजू शेट्टी.

बातमी पान ५ वर

## अंत पाहू नका

गेले दोन महिने दूध, कांदा आणि बेदाण्याच्या भावासाठी आंदोलन सुरू आहे, तरीही केंद्रापासून राज्याच्या मंत्र्यांपर्यंत कोणीही धोरणात्मक निर्णयासाठी पुढे आलेले नाही. शेतकऱ्यांच्या भावना तीव्र झाल्या आहेत, विधिमंडळाच्या प्रवेशद्वारावर आंदोलन केले आहे, शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरूच राहील.

– खासदार राजू शेट्टी



• वर्ष ७ • अंक ११ •१ मे २०१२ • पाने २०

स्वाभिमानी विचार

संपादक : खासदार राजू शेट्टी

• कार्यकारी संपादक •
डॉ. महावीर अक्कोळे

• सह संपादक •
डॉ. श्रीवर्धन पाटील, जगदीश इनामदार

• निवासी संपादक : सदाभाऊ खोत

•मानद सल्लागार : मा. श्री. अण्णा हजारे राळेगणसिद्धी, न्या. पी. बी. सावंत पुणे, न्या.बी.जी.कोळसे पाटील पुणे, . प्रा. शरद पाटील सांगली, कुमार सप्तर्षी पुणे, माजी आमदार. वामनराव चटप चंद्रपूर • व्यवस्थापक : सुभाष शेट्टी • कार्यालय : भरत पतसंस्थेच्या माडीवर, पोलीस स्टेशनसमोर, जयसिंगपूर, ता. शिरोळ. फोन : (०२३२२) २२४३२७

SWABHIMANI VICHAR (Fortnightly) स्वाभिमानी प्रतिष्ठान संचलित पाक्षिक स्वाभिमानी विचार हे पत्र संपादक *खासदार राजू उर्फ देवाप्पा आण्णा शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, पोलिस स्टेशनजवळ, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. प्रकाशन स्थळ : स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र राज्य). दूरध्वनी : (०२३२२) २२४३२७. मुद्रण स्थळ : सुनील प्रिंटर्स, जयसिंगपूर. फोन (०२३२२) २२४३२७ पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी * यांची आहे. पाक्षिक स्वाभिमानी विचारमधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवण्यात आलेले आहेत. Decleration No. Desk No. VII Home N.P.S.R./58/2005 RNI No. MAH/MAR/2005/16213 या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

Email : rajushetti@gmail.com

वार्षिक वर्गणी रु. १००/-


## संपादकीय


डॉ. महावीर अक्कोळे
mahaveerakkole@gmail.com


# राष्ट्रीय आपत्ती निवारण समितीचा बेशरमपणा

कधी कधी वास्तव हे कल्पितापेक्षाही भयंकर आणि शर्मनाक असते याची प्रचिती येते. महाराष्ट्रातील भीषण पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर दुष्काळाने होरपळलेल्या जनतेला आधार देण्यासाठी केंद्राने पाठवलेल्या आपत्ती निवारण समितीचे प्रताप पाहिल्यानंतर कुणाही संवेदनशील माणसाची मान खाली झुकल्याशिवाय राहणार नाही.

एका बाजूला स्वाभिमानीचे खासदार राजू शेट्टी विधानभवनासमोर राज्यातल्या दूध उत्पादकांना, कांदा आणि बेदाणा उत्पादकांचा न्याय मिळावा म्हणून आंदोलन करताना, तर दुसऱ्या बाजूला दुष्काळाच्या आपत्तीची पाहणी करण्यासाठी नगर जिल्ह्यात गेलेल्या आपत्ती निवारण समितीच्या सदस्यांनी नावालाच दोन चार गावांना भेटी देऊन सगळा ड्रायफ्रूटस, उसाचा रस, मटण आणि चिकनवर ताव मारण्यात घालवावा यापेक्षा आपल्या लोकशाहीचे वाईट धिंडवडे कुणी काढले नसतील. अनेक दिवस अनेकांशी वेगवेगळ्या पध्दतीने चर्चा करूनही सरकारला प्रश्न सोडविता आलेला नाही. ग्राहकाला दुधासाठी पूर्वीपेक्षा जास्त पैसे खिशातून काढावे लागत असताना दूध उत्पादक शेतकऱ्याला मात्र लिटरला तीन रूपये कमी मिळतो आहे. बेदाण्यावरील आयात कर कारण नसताना कमी केल्याने आयात वाढून बेदाणा उत्पादक द्राक्ष शेतकरी अक्षरशः मेटाकुटीला आला आहे. कारण देशी बेदाण्याचा भाव दरीत कोसळल्यासारखा कोसळलाय. तीन्ही बाजूंनी संकटांनी घेरल्यामुळे महाराष्ट्रातला शेतकरी हवालदील झालेला असतानांच भीषण पाणी टंचाईमुळे दुष्काळ पडून त्यातही त्यालाच होरपळावे लागेल अशी अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली आहे. या शरीराने, मनाने नि परिस्थितीने खचलेल्या शेतकऱ्याला काहीतरी न्याय, थोडासा दिलासा मिळवून द्यावा

पान २ वर ▸

# राष्ट्रीय आपत्ती निवारण समितीचा बेशरमपणा

▶ पान १ वरुन

व य कोडग्या संवेदनशून्य सरकारला जाग आणावी म्हणून खासदार राजू शेट्टी यांनी मुंबईत चक्क विधानभवनासमोर आंदोलन केले. दूध, कांदा व बेदाणा हे कवडीमोल बनलेले (खरे तर चुकीच्या धोरणाम ुळेच कवडीमोल बनवलेले) जिन्नस सरकारमधील शेतकऱ्यांचे सोयरसुतक नसलेल्या लोकांना फुकट देऊन जाग आणण्यासाठी हे अनोखे आंदोलन केले होते. यात खासदार राजू शेट्टींसह अनेक स्वाभिमानीच्या कार्यकर्त्यांना अटकही करण्यात आली.

या पार्श्वभूमीवर दुष्काळी दौरा करण्यासाठी महाराष्ट्रात आलेले आपत्ती निवारण चे सदस्य दौरा शाही कसा होईल यावर मात्र जातीनिशी लक्ष देतात नि दुष्काळाच्या खाईत उपाशीतापाशी दिवस काढणाऱ्या शेतकऱ्यांच्या साऱ्या व्यथा, समस्या कचऱ्याच्या डब्यात टाकून चिकन मटणवर ताव मारून तासा दोन तासात दौरा आटोपता घेतात या बेशरमपणाला काय म्हणावे? केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी पंतप्रधानांना सांगून ही कमिटी पाठवली जाणार होती. म्हणतात ! या मशाहीफ कमिटीत केंद्रीय कृषी खात्याचे सहसचिव राज्याचे मदत व पुर्नवसन सचिव, नाशिक विभागाचे महसूल आयुक्त, व स्थानिक जिल्हाधिकारी यांच्यासह बरेच बडे अधिकारी होते असे समजते. या सर्वांवर कारवाई होणार का? रोम जळत असताना फिडेल वाजवत बसणाऱ्या नीरो च्या या आधुनिक अवलादींना खरे तर घरचाच रस्ता दाखवायला हवा!


## श्री भरत अर्बन को-ऑफ बँक लि., जयसिंगपूर

ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

■ २८ हजारांवर सभासद ■ ... ■ बँक सतत नफ्यात ■ ...

श्री. व्ही. बी. हुल्ले.
बी. ए. बी. कॉम.
चिफ एक्झि. ऑफिसर

श्री. अशोक शां रुग्गवाळ.
बी. कॉम
व्हा. चेअरमन

पै. विठ्ठल बापूराव मोरे
एम. ए.
चेअरमन









प्रोप्रा. अरुण किर्तीकुमार माणगावे

M/S. MANGAVE BOREWELLS

BOREWELL CONTRACTOR

Opp. Mangave Petrol Pump. Jaysingpur. Dist : Kolhapur (M.S.)

Ph. (02322) 229866. Mo. 9822551008/9422428266



Shree Datta Prestrestess

M.f. PCC Pole

Shirol Road, Jaysingpur.



गडहिंग्लज : पोलिस ठाण्यात शनिवारी गडहिंग्लज कारखान्याच्या लेखापरीक्षण अहवालावर लेखापरीक्षक बी. एस. बडाख यांच्याशी चर्चा करताना राजेंद्र गड्ड्यान्नावर व दिलीप बेळगुद्री.

# गडहिंग्लज कारखान्याच्या संचालकांवर गुन्हा दाखल

## स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या आंदोलनाला यश

गडहिंग्लज : ऊस गाळपास आल्यानंतर चौदा दिवसांच्या आत उत्पादकांना एफ आरपीनुसार बिल आदा न केल्याने अप्पासाहेब नलवडे गडहिंग्लज तालुका साखर कारखान्याचे अध्यक्ष ॲड. श्रीपतराव शिंदे, उपाध्यक्ष प्रकाश चव्हाण यांच्यासह २२ संचालकांविरुद्ध आज येथील पोलिसांत फ ौजदारी गुन्हा दाखल झाला. याबाबत सहकारी संस्थांचे (साखर) तृतीय विशेष लेखापरीक्षक बी. एस. बडाख यांनी फि र्याद दिली आहे.

दरम्यान, वेळेत ऊस बिले न दिल्याबद्दल या कारखान्याच्या संचालकांवर दाखल झालेला हा दुसरा फ ौजदारी गुन्हा आहे. यापूर्वी एक ऑक्टोबर २०११ ला गुन्हा दाखल झाला होता. त्या वेळी न्यायालयाने संचालकांचा अंतरीम जाम ीन अर्ज म ंजूर केला आहे. या कारवाईम ुळे स्वाभिम ानी शेतकरी संघटनेच्या लढ्याला यश आले आहे.

गुन्हे दाखल झालेल्या संचालकांत ॲड. शिंदे (अध्यक्ष), श्री. चव्हाण (उपाध्यक्ष), विकास पाटील (करंबळी), श्रीपती कदम (कडगाव), आबासाहेब देसाई (ऐनापूर), बाबूराव म दकरी (दुंडगे), बाळासाहेब म ोरे (गडहिंग्लज), संभाजी नाईक (म ुत्नाळ), रम ेश आरबोळे (म ुगळी), बाबासाहेब पाटील (गिजवणे), किरण पाटील (कडलगे), बाळासाहेब म ोकाशी (नांगनूर), प्रकाश पताडे, अप्पी पाटील (म हागाव), भैरू पाटील (वाघराळी), सौ. स्वाती कोरी (गडहिंग्लज), राजाराम सावंत (वाघराळी), सौ. क्रांतीदेवी

पान ४ वर ▶

# गडहिंग्लज कारखान्याच्या संचालकांवर गुन्हा दाखल

▶ पान ३ वरुन

कुराडे (ऐनापूर), सौ. निर्मला म गदूम (बेळगुंदी), चंद्रकांत जांगनुरे (हलकर्णी), चंद्रकांत कांबळे (हरळी खुर्द), भीम राव पाटील (भडगाव) यांचा समावेश आहे.

गडहिंग्लज कारखान्याने यंदाच्या हंगाम त १५ डिसेंबरपर्यंत गळितास आलेल्या उसाचे बिल दिले होते. त्यानंतरच्या उत्पादकांना एक पैसाही दिलेला नव्हता. डिसेंबर ते म ार्चपर्यंतचे बिल त्वरित मि ळावे म्हणून २६ म ार्चला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजेंद्र गड्ड्यान्नावर यांच्या नेतृत्वाखाली येथील प्रांत कार्यालयावर म ोर्चा काढण्यात आला. त्यावेळी सात दिवसांची म ुदत देण्यात आली होती; परंतु कारखान्याने १६ ते ३१ डिसेंबरपर्यंतच गळितास आलेल्या उसाचे साडेसात कोटींचे बिल दिले; म ात्र १ जानेवारी ते २६ म ार्चपर्यंतची बिले अद्याप न दिल्याने संचालकांवर फ ौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या म ागणीसाठी शेतकरी संघटनेने दोन दिवसांपासून कोल्हापूरच्या प्रादेशिक सहसंचालक (साखर) डी. आर. घोडे यांच्याकडे रेटा लावला होता. अखेर श्री. घोडे यांनी शुक्रवारी (ता. १३) संचालकांवर फ ौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश विशेष लेखापरीक्षक श्री. बडाख यांना दिले. यानंतरच संघटनेने आंदोलन मागे घेतले.

श्री. बडाख यांनी आज येथील पोलिसांत शुगरकेन कंट्रोल (ऑर्डर) १९६६ च्या कलम ३ (३) चा भंग केल्याने अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ चे कलम ७ व १० अन्वये संचालकांविरुद्ध फ ौजदारीची फि र्याद दिली.

## लेखापरीक्षणातील ताशेऱ्यांवर चर्चा..

श्री. बडाख यांनीच या कारखान्याचे लेखापरीक्षण केले आहे. आज श्री. बडाख येथे आल्याचे कळताच संघटनेचे श्री. गड्ड्यान्नावर, दिलीप बेळगुद्री यांच्यासह कार्यकर्त्यांनी त्यांची भेट घेतली. यापूर्वीच्या लेखापरीक्षणात श्री. बडाख यांनी काम गारभरती, रस्ते निधीचा विनियोग, संचित तोटा कम ी दाखविण्यासाठी कारखाना जिंदगीचे वाढविलेले म ूल्य, अल्कोहोल विक्री यासह ओढलेले अनेक ताशेरे, गंभीर दोषांबाबत चर्चा केली. याबाबत कारखान्यावर कोणती कारवाई केली, याचा जाब श्री. गड्ड्यान्नावर यांनी विचारला. त्यावर केवळ ताशेरे व दोष अहवालात म ांडण्याचाच म ला अधिकार असल्याचे श्री. बडाख यांनी सांगून कारवाईचा अधिकार प्रादेशिक सहसंचालकांना (साखर) असल्याचे स्पष्ट केले.

## ऊस बिल न दिल्याने कारवाई

कारखान्याने १ जानेवारी ते २६ म ार्चअखेर १ लाख ५३ हजार ८७९ टन उसाचे गाळप केले आहे. त्याचे १४८३.६७ रुपये एफ आरपीच्या दरानुसार कारखान्याने २२ कोटी ८६ लाखांचे ऊस बिल व त्यावरील १५ टक्क्यांप्रम ाणे होणारे व्याज उत्पादकांना देणे आहे. अद्याप ही रक्कम उत्पादकांना दिली नसल्याने संचालकांवर ही कारवाई करण्यात आली.



**महाराष्ट्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने अचानक मोठ्या वादळाची शक्यता होती. पण उत्तरेकडील वाऱ्यांचा वेग घटल्याने वादळ शमले! नेमकं काय वाचताय? मान्सूनचं वार्तापत्र की मुंडेंची बातमी**

# नव्या कायद्याविरोधातील समित्या बरखास्त करा

**सदाभाऊ खोत : फुकटचे 'वळू' पोसायला शेतकरी रिकामा नाही**

सांगली : राज्य शासनाच्या प्रस्तावित नव्या बाजार समिती कायद्याला विरोध करणाऱ्या बाजार समि त्या बरखास्त करा, अशी म ागणी स्वाभिम ानी शेतकरी संघटनेचे नेते सदाभाऊ खोत यांनी आज येथे पत्रकार परिषदेत केली. हा कायदा शेतकरी हित साधणारा असून त्याला व्यापारी व समि ती संचालकांचा विरोध आहे. हे फु कटचे 'वळू' पोसायला शेतकरी रिकाम ा नाही. त्याम ुळे या कायद्यासाठी आम्ही राज्यव्यापी आंदोलन करू, असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

श्री. खोत म्हणाले,''राज्य शासनाने प्रस्तावित केलेल्या नव्या कायद्यात, शेतकऱ्यांनी आपला भाजीपाला थेट ग्राहकांना विकावा किंवा खुल्या पद्धतीने सौदा काढावा. शेतकरी बाजार समि तीच्या आवारात आपले वाहन उभे करून विक्री करू शकतो, अशी तरतूद आहे. त्याम ुळे शेतकऱ्यांना खुल्या पद्धतीने विक्री करून चांगला दर मि ळेलच, शिवाय ग्राहकांनाही योग्य भावात म ाल मि ळू शकेल. या नव्या कायद्याबाबत शासनाने बाजार समि त्यांचे म्हणणे म ागवले आहे. त्याला अजून आठ दिवसांची म ुदत आहे, म ात्र त्याआधीच सर्व समि त्यांनी विरोध कळविला आहे. या कायद्याने बाजार समि त्या कम कुवत होतील, म ोडून पडतील, हम ाल-काम गारांची उपासम ार होईल, शेतकऱ्यांना संरक्षण राहणार नाही असा त्यांचा युक्तिवाद आहे. तो साफ खोटा असून दलाल, व्यापारी व राजकीय अड्डा करून बसलेल्या वळूंना पोसण्यासाठी हा विरोध केला जातोय.''

ते म्हणाले, ''बाजार समि त्या शेतकऱ्यांच्या पैशावर चालतात. शेतकरी हितासाठी स्थापना झाली; म ात्र त्या आता शेतकऱ्यांचे कत्तलखाने बनले आहेत. त्यांनी कुठल्या सुविधा दिल्या ते सांगावे. शेतीम ाल ठेवायला गोदाम , शीतगृह, शेतकऱ्यांना विश्रांतिगृह आहेत का? पिण्याच्या पाण्याची सोय त्यांनी करून दिली नाही. नुसता लुटण्याचे अड्डे बनले आहेत. नाशिकम ध्ये कम ी दरात शेतम ाल विकण्यास विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांना हम ाल-दलाल रिंगण करून म ारहाण करतात. पुण्यात शंभर जुडी भाजीपाल्याम ागे दहा जुडी फु कट द्याव्या लागतात. म ुंबईत रुम ालाखालून सौदा होतो. हे संघटित लोक शेतकऱ्यांना लुटत आहेत. नव्या कायद्याने हे प्रम ाण कम ी होईल आणि शेतकऱ्यांचा व ग्राहकांचाही फ ायदा होणार आहे. त्याला विरोध करत बाजार समि त्यांना बंद आंदोलनाची तयारी केल्याचे सम जते. तसे झाले तर आम्ही राज्यव्यापी आंदोलन करून त्यांचा विरोध म ोडून काढू. हा कायदा म ंजूर झालाच पाहिजे. त्यासाठी येत्या १८ ला विधानसभेत आम दारांना निवेदन देणार आहोत.''

## शेतकऱ्यांना परवाना द्या

सदाभाऊ खोत म्हणाले,''व्यापाऱ्यांनी या कायद्याला जोरदार विरोध केला आहे. जो व्यापारी बंद ठेवेल त्याचा परवाना रद्द करावा आणि शेतकऱ्यांच्या पोरांना परवाना द्यावा. ठाण म ांडून गब्बर झालेल्या प्रस्थापितांना धक्का दिल्याशिवाय शेतकऱ्यांचे हित होणार नाही.''

# शेतकरी आंदोलन विधानभवनाच्या दारात!

मुंबई (प्रतिनिधी) : कांदा, बेदाणा आणि दुधाच्या भावावरून शेतातून रस्त्यावर उतरलेले शेतकरी आंदोलन काल (बुधवारी) विधानभवनापर्यंत पोचले. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखालील शेतकऱ्यांनी काल (ता. १८) विधानभवनासमोर मो फत कांदे, बेदाणे आणि दूध विक्री आंदोलन केले. आंदोलनकर्त्या दीडशे शेतकऱ्यांना पोलिसांनी अटक केली. शेतकऱ्यांच्या आंदोलनामुळे विधिमंडळाच्या प्रवेशद्वारावर दूध, कांदा, बेदाणा यांचा खच पडला होता. बुधवारी (ता. १८) दुपारी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे काम सुरू असताना शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांसह खासदार राजू शेट्टी विधानभवनाच्या प्रवेशद्वारावर पोचले. विधानभवनात प्रवेश करण्यापासून पोलिसांनी शेतकऱ्यांना रोखले. शेतकऱ्यांनी सोबत दुधाचे कॅन, कांद्याच्या गोण्या आणि बेदाणे आणले होते. पोलिस आणि शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांमध्ये वादावादी झाल्यानंतर कांद्याच्या गोण्या विधानभवनाच्या प्रवेशद्वारावरच सांडल्या, 'कांद्याला हमीभाव मिळालाच पाहिजे' अशा जोरदार घोषणा देत शेतकऱ्यांनी कांदे उधळून निषेध व्यक्त केला. दूध दरवाढ झालीच पाहिजे, बेदाण्याला भाव द्या अशा घोषणा देत दुधाचे कॅन प्रवेशद्वारावर सांडले. आंदोलनात शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांसह २०० शेतकरी सामील झाले होते. सर्व शेतकऱ्यांसह शेतकरी संघटनेच्या नेत्यांना अटक करून आझाद मैदान पोलिस ठाण्यात नेण्यात आले. खासदार राजू शेट्टी यांनाही या वेळी अटक करण्यात आली.

# साखर कारखानानिहाय आंदोलन

## राजू शेट्टी : दुसरा हप्ता २०० प्रमाणे, गत हंगामातील बिल घोषित करा

इस्लाम पूर, ता. ११ : यंदाच्या हंगाम ातील दुसरा हप्ता प्रतिटन २०० प्रम ाणे आणि गत हंगाम ातील अंतिम  बिल हंगाम सम ारोपापूर्वी घोषित करा; अन्यथा साखर कारखानानिहाय आंदोलन छेडू, असा इशारा स्वाभिम ानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनी आज येथे दिला.

येथील राजाराम बापू नाट्यगृहात स्वाभिम ानी शेतकरी संघटनेतर्फे  नूतन जिल्हा परिषद व पंचायत समि ती सदस्यांचा सत्कार व शेतकरी म ेळावा झाला. त्यात ते बोलत होते. पै. हणम ंतराव पाटील - शिरटेकर अध्यक्षस्थानी होते. श्री. शेट्टी म्हणाले, ''ऊस दराबाबत आंदोलनानंतर सहकार मंत्री दिलेला शब्द पाळणार नसतील तर शेतकऱ्यांनाही कायदा हातात घ्यावा लागेल. राज्यातील माफि या राज्यकर्त्यांच्या मांडीला मांडी लावून बसत आहेत. त्यांच्यावर कारवाई होत नाही; म ात्र खसखस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांना अफू च्या तस्करीप्रकरणी आरोपी म्हणून पिंजऱ्यात उभे राहावे लागत आहे. यासाठीही संघर्ष सुरू राहणार आहे.''

ते म्हणाले, ''निवडणुका लढवणे हा आम चा धंदा नाही; पण शेतकऱ्यांसाठी त्या लढवल्या व जिंकूनही दाखवल्या. राज्यात नवीन दीडशे राजघराणी तयार झाली आहेत. पक्ष कोणताही असो, या राजघराण्यातीलच लोक सत्तेत असतात. ही प्रथा मोडण्यासाठी आम्ही विडा उचलला आहे. आता धोरणे प्रस्थापितांच्या वाड्यात किंवा माडीवर न ठरता ती बांधावर ठरतील, हे आम्ही दाखवून दिले आहे.'' त्यांनी टीका केली, की दुष्काळी दौऱ्यात उपाययोजना दूरच, पण मुख्यमंत्र्यांसह सारे एकम ेकांवर टीकाटिप्पणी दिवस काढत आहेत.''

प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत म्हणाले, ''पक्षाने म ाळशिरस, पंढरपूर, शिरोळ, कोल्हापूर, वाळवा येथील जागा जिंकून मुसंडी मारली. दुष्काळ या वर्षीच पडल्यासारखे वातावरण सरकार करीत आहे. पन्नास वर्षे राज्यकर्त्यांनी नारळ फोडण्यापलीकडे कोणतेही काम  केले नाही. जिल्ह्यात नागनाथअण्णांचे वारसदार म्हणून वावरणाऱ्या एका मंत्र्याने डोळ्यांत पाणी आणून ढोंग करण्यापेक्षा दुष्काळी भागातील रखडलेल्या योजना पूर्ण कराव्यात. तीच



इस्लामपूर : येथे बुधवारी झालेल्या शेतकरी मेळाव्यात खासदार राजू शेट्टी यांनी म ार्गदर्शन केले.

खरी अण्णांना श्रद्धांजली ठरेल. मुंबईत राहणाऱ्या मंत्र्यांच्या बाथरूममध्ये पाणी खर्च होते तेवढे पाणी दुष्काळी भागाला दिले तरी दुष्काळ हटेल. कांदा बटाट्याचा वापर करणारा कृपाशंकरसिंह ३०० एकर जमीन घेतो, हजारो कोटी रुपये कमवतो, त्याच्यावर कोणतीही कारवाई नाही; मग अजाणतेपणी खसखस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांवर कारवाईसाठी सरकारची घाई कशासाठी?''

ते म्हणाले, ''विधानभवनात सोन्याच्या गणपतीसाठी १४ आम दार आंदोलन करून निलंबित झाले; मात्र शेतीप्रधान राज्यात एकाही आम दाराला शेतकऱ्यांचे प्रश्न आणि दुष्काळावर विधानभवनात आंदोलन करावेसे वाटले नाही, ही शोकांतिका आहे. यासाठी पक्षभेद विसरून सर्वांनी एकत्र येऊन यांना गाडायला हवे.''

जिल्हा परिषद सदस्य रणधीर नाईक, स्वाभिमानीचे जिल्हाध्यक्ष बी. जी. पाटील, वाळवा तालुकाध्यक्ष दिनकरराव पाटील, सयाजीराव मोरे, कऱ्हाड तालुकाध्यक्ष पंजाबराव पाटील उपस्थित होते. पोलिस उपनिरीक्षकपदी निवड झालेल्या वाळवा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मुलांचाही सत्कार झाला.

# दूध भुकटीची निर्यात सुरू करा : राजू शेट्टी

## दूध, दुष्काळ प्रश्नावर पवारांशी चर्चा

सांगली : दूध भुकटीची निर्यात पुन्हा सुरू करण्याबाबत पाठपुरावा करा, अशी विनंती खासदार राजू शेट्टी यांनी आज केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्याकडे केली. दुष्काळाकडे गांभीर्याने पाहावे, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

श्री. शेट्टी यांनी नवी दिल्लीत श्री. पवार यांची भेट घेतली. त्यांच्याशी दूध आणि दुष्काळी प्रश्नावर अर्धा तास चर्चा केली. त्या संदर्भात स्वाभिमानी शेतकरी संघटनेने येथे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की दुधाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले आहे. दररोज दूध उचलले जात नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. शेतकरी आणि ग्रामीण भागातील लोकांचे जीवन दुधावर अवलंबून आहे. त्यामुळे दूध भुकटी निर्यात करण्यास बंदी केली आहे. ती मागे घ्यावी आणि पुन्हा निर्यात सुरू व्हावी, यासाठी आपण पुढाकार घ्यावा, अशी विनंती केली. राज्यातील दुष्काळी भागातील लोक दुष्काळाने होरपळून निघाले आहेत. जनावरांना चारा, पाणी याबाबत ठोस उपाययोजना करण्याची गरज असून हा प्रश्नाकडे गांभीर्याने पाहाण्याची गरज आहे, असेही स्पष्ट केले. श्री. पवार यांनी दूध भुकटी निर्यातीसाठी पाठपुरावा केला जाईल. दुष्काळी भागातील लोकांना मदतीसाठी राज्य सरकारने उपाययोजना केल्या आहेत. केंद्र सरकारकडून अर्थसहाय्य देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

# चलाखीने निधी आणून तुंगला रस्ते डांबरीकरण

## खासदार शेट्टींकडून कौतुक : कामांसाठी अनेकांचे सहकार्य

तुंग : अनेक वर्षे तुंगकरांना रस्त्यांचा प्रश्न भेडसावत होता. पावसाळ्यात मुख्य रस्त्यात तर घसरगुंडी होत असे. कधीकाळी आमदार संभाजी पवार यांच्या निधीतून सर्व रस्त्यांचे डांबरीकरण झाले होते. त्यानंतर अनेकजण आमदार व मंत्रीही झाले. परंतु रस्त्यांचा प्रश्न तसाच राहिला. सदस्य व नेत्यांनी पुढाकार घेऊन खासदार शेट्टी यांच्याकडून सात लाखांचा निधी मंजूर करून आणला. काम झाले. त्याचे उद्घाटनही झाले.

रस्त्यांची अवस्था व लोकांचा आग्रह पाहून खासदार शेट्टी यांनी दीड लाखांचा निधी देण्याची ग्वाही दिली. मुख्य बाजारपेठेचा हनुमान मंदिर ते बिरोबा मंदिर व ईश्वरा गुरव ते दिवसे घर रस्त्यांचे भाग्य उजळले.

ग्रामपंचायतीत काँग्रेस व शेतकरी संघटना यांची सत्ता आहे. ग्रामविकास मंत्री जयंत पाटील यांच्या इस्लामपूर मतदारसंघात व हातकणंगले लोकसभा मतदारसंघात तुंगचा समावेश झाला. काँग्रेसचा एकही आमदार नाही. निधी आणायचा कोणाकडून अशी समस्या होती. सुशिक्षित व अभ्यासू सदस्यांनी खासदार शेट्टी, आमदार भगवानराव साळुंखे, चंद्रकांत पाटील, जिल्हा परिषदेचे समाज कल्याण सभापती सदाशिव खाडे यांच्या माध्यमातून निधी आणून प्रश्न मार्गी लावले.

त्यांच्या प्रयत्नांचे शेट्टी यांनीही कौतुक केले. विकासात राजकारण न आणता पंचायतीने समावेशक राजकारण करून विकास करण्याचा ध्यास घेतला हे कौतुकास्पद आहे. तुंग ग्रामपंचायतीने 'करून दाखवले' असे उद्गार त्यांनी काढले.

सरपंच सौ. सुनंदा गुरव, उपसरपंच विलास डांगे, माजी उपसरपंच संजय वाईंगडे, वसंतदादा कारखान्याचे संचालक सचिन डांगे, जिल्हा परिषद सदस्य संयोगिता कोळी, पंचायत समिती सदस्य शुभांगी घुबडे-पाटील, माणिक चौधरी, ग्राम पंचायत सदस्य उपस्थित होते.

# दुष्काळाची चेष्टा करणाऱ्या सरकारला खाली खेचा

## खासदार राजू शेट्टी : मंत्र्यांना हार नको; लाल दिव्याच्या काचा फोडा

माडग्याळ : दुष्काळी तालुक्याची चेष्टा करणाऱ्या सरकारला खाली खेचा. मंत्र्यांना हार घालू नका, त्यांच्या लाल दिव्याच्या काचा फोडा, असे आवाहन शेतकरी संघटनेचे खासदार राजू शेट्टी यांनी उमदी येथील सभेत केले. खासदार राजू शेट्टी यांनी आज जत तालुक्यातील माडग्याळ व उमदी परिसरातील दुष्काळाची पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांनी दुष्काळग्रस्तांच्या वेदना जाणून घेतल्या. दुष्काळी उपाययोजनांबाबत होत असलेल्या दुर्लक्षाबद्दल संताप व्यक्त करून ते म्हणाले, 'सर्व शेतकरी संघटित व्हा व संघर्ष करा, तरच हे सरकार ताळ्यावर येईल. दुष्काळी जनतेची जाण नाही. मंत्र्यांना डांबून ठेवा. त्यांना इकडे फिरकू देऊ नका, मला साथ द्या, मी तुम्हाला म्हैसाळचे पाणी आणून देतो. शेतकरी संघटनेचा एक आमदार या तालुक्यातून द्या, तालुक्यात भयानक दुष्काळ आहे. मंत्री व शासकीय अधिकाऱ्यांचे फक्त दौरे आहेत. त्यांना तालुक्यात फिरू देऊ नका.' यावेळी निवृत्ती शिंदे, वहाब मुल्ला, भिमशा माळी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'शेतकऱ्यांच्या बांधाला जोडणाऱ्या रस्त्यासाठी राजू शेट्टी प्रयत्नशील'

वाळवा : शेतकऱ्यांच्या बांधाला जोडणारे रस्ते प्रामुख्याने झाले पाहिजेत म्हणून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे खासदार राजू शेट्टी सातत्याने प्रयत्नशील आहेत, अशी माहिती संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सदाशिव खोत यांन आज गाताडवाडी (ता. वाळवा) येथे दिली.

गाताडवाडी ते येडेनिपाणी दरम्यानच्या रस्ता कामाचे उद्घाटन श्री. खोत, बी. जी. पाटील, संदीप राजोबा, नारायण कराडे, सरपंच सौ. वैशाली जाधव, उपसरपंच प्रकाश नरळे यांच्या उपस्थितीत झाले. पंतप्रधान सडक योजनेतून रस्त्यासाठी सतरा लाख व जिल्हा नियोजन योजनेतून १९ लाखांचा निधी यासाठी मिळाला आहे. ३ किलोमीटरचा हा रस्ता आहे. श्री. खोत म्हणाले, '' शेतकऱ्याला शेतात जाण्यासाठी रस्त्यांची सुविधा अत्यावश्यक आहे. याची जाणीव ठेवून शेतकऱ्यांच्या बांधाला जोडणारे रस्ते अग्रक्रमाने व्हावेत, असा आमचा आग्रह आहे. उत्पादित शेतमालाची वाहतूक अधिक सुलभ होण्यासाठी रस्ते आवश्यक आहेत. भाजीपाला विक्रीला शासनाने थेट परवाना दिला पाहिजे. जिल्हावार धान्य महोत्सवांचे आयोजन करून शेतमालाच्या विक्रीसाठी प्रोत्साहनाच्या योजना शासनाने राबवाव्यात.'' माजी सरपंच शंकर जाधव यांनी प्रास्ताविक केले. संघटनेचे जिल्हाध्यक्ष सयाजीराव मोरे यांनी आभार मानले.

# शेतकऱ्यांना संपवणारी खत दरवाढ

ऊस, केळी, द्राक्षे, ज्वारी, भात, कांदा, भाजीपाला इ. सर्व प्रकारच्या वाढीसाठी रासायनिक खतांची आवश्यकता असते. या खतांशिवाय शेतकरी भरघोस उत्पादन घेऊ शकत नाहीत. मात्र आज आपल्या भागातच नव्हे तर संपूर्ण देशातच खताचा तुटवडा निर्माण झाले असतानाच झालेली दरवाढ तर शेतकऱ्यांचे कंबरडे मोडणारी अशीच आहे.

रासायनिक खतांचे दर गगनाला जाऊन भिडलेले आहेत. पेट्रोल डिझेलचे दर वाढविताना १०दा नव्हे तर १०० वेळा विचार केला जातो. डिएपी खताचे दर तर दुप्पट झाले आहेत. शेतकऱ्यांच्या माथी निष्कारणपणे दरवाढ मारली जात आहे. ५० किलोच्या पोत्याचा दर ५९५ रूपयांवरून ९६४ व ए. पो. पी. च्या पोत्याचा दर ५९५ रूपयांवरून ९१५ रूपये झाला आहे. याप्रमाणेच इतर खतांचे दरही मोठ्या प्रमाणात वाढलेले आहेत. ही दरवाढ शेतकऱ्यांच्या जीवावरच उठलेली आहे.



**गडहिंग्लज : विभागातील रस्त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी तहसील कार्यालयासमोर शुक्रवारी धरणे आंदोलन करताना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते.**

# रस्त्यांसाठी 'स्वाभिमानी'ची धरणे

गडहिंग्लज : गडहिंग्लज विभागात सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सुरू असलेल्या रस्त्यांचे काम चांगल्या दर्जाचे व्हावे, या मागणीसाठी आज स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे धरणे आंदोलन झाले. संघटनेचे विभागप्रमुख राजेंद्र गड्यान्नावर यांच्या नेतृत्वाखाली येथील तहसील कार्यालयासमोर दिवसभर धरणे धरण्यात आली.

तहसीलदार संजय पवार यांच्यासमवेत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. तीत सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता व तिन्ही तालुक्यांचे उपअभियंता यांच्यासोबत २ मे रोजी संयुक्त बैठक घेण्याचे ठरले. त्यानंतर आंदोलन मागे घेतले.

गडहिंग्लज विभागात सुरू असलेल्या रस्त्यांसाठी डांबर व खडी यांच्या वापरल्या जाणाऱ्या प्रमाणाची माहिती मिळावी, यासाठी 'स्वाभिमानी'तर्फे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा केला होता. तेरणी, तुप्पूरवाडी, ऐनापूर, हलकर्णी, बसर्गे व खणदाळ येथील रस्त्यांच्या कामात डांबर व खडीचा वापर कमी प्रमाणात झाला असल्याचे आढळले आहे.

तेरणी येथील बीबीएम कामाची गुणवत्ता चाचणी झाल्याशिवाय काम सुरू करू नये, अशी मागणी केली होती, तरीही पूर्वसूचना न देता संबंधित ठेकेदार व बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी हा रस्ता पूर्ण केला. कामातील भ्रष्टाचार झाकण्यासाठी हा प्रकार केला असल्याचे पत्रकात म्हटले आहे. श्री. गड्यान्नावर यांच्यासह शिवाजी म्हातुगडे, चनबसाप्पा आगसगी, विश्वनाथ पाटील, अप्पाजी चव्हाण, संदीप पाटील, कृष्णा पाटील, अप्पासाहेब देसाई, संजय जाधव, वीरगोंडा देसाई, अशोक पाटील आदी कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले.

दरम्यान, उपअभियंता श्री. मगदूम यांनी दुपारी आंदोलकांशी चर्चा केली; परंतु कार्यकारी अभियंत्यांनी भेट घेऊन याप्रश्नी चर्चा केल्याशिवाय आंदोलन थांबविणार नसल्याचा निर्धार आंदोलकांनी केला होता, त्यामुळे सायंकाळी सहाला तहसील कार्यालयात झालेल्या बैठकीत वरील निर्णय घेण्यात आला. या वेळी पोलिस निरीक्षक आर. टी. जगताप उपस्थित होते.

# पांढरा कांदा लावा नफा मिळवा!


कोल्हापूर, : कांद्याच्या अतिरिक्त उत्पादनामुळे वारंवार कोसळणारा भाव ही कांदा उत्पादक शेतकऱ्यांसह सरकारपुढील मोठी समस्या निर्माण होऊ लागली आहे. यावर उपाय म्हणून शेतकऱ्यांनी पांढरा कांदा लावल्यास देशाला परकीय चलनही मिळू शकते व कांद्याचे कोसळणारे भाव रोखणेही शक्य होऊ शकते. परदेशात पांढऱ्या कांद्याला मोठी मागणी आहे. सरकारने पांढरा कांदा लावण्यास प्रोत्साहन देऊन कांद्यापासून पावडर, कीस बनविणारे प्रकल्प उभारल्यास शेतकरी आणि सरकारसाठी ते फायद्याचे ठरू शकते. जळगावमध्ये जैन इरिगेशन सिस्टिम करार पद्धतीने शेतकऱ्यांना बियाणे पुरवून पांढरा कांदा घेते. त्यावर प्रक्रिया करून निर्यात करते. सरकारनेही पांढरा कांदा लावण्यासाठी प्रोत्साहन देऊन या कांद्यापासून पावडर, कीस बनविणारे उद्योग उभारण्याची आवश्यकता आहे.

## कांदा ठरतोय समस्या

कांदा उत्पादनात भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. महाराष्ट्रात कांद्याचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जाते. खरीप, लेट खरीप (रांगडा) आणि रब्बी असे वर्षातून तीन वेळा उत्पादन घेतले जाते. कांदा हे नगदी पीक असल्याने शेतकऱ्यांचा हे पीक घेण्याकडे जास्त कल असतो. त्यामुळे राज्यासह देशभरात अनेकदा कांद्याचे अतिरिक्त उत्पादन निघते. कांदा नाशवंत असल्याने तो जास्त दिवस राहत नाही. विशेषत: खरीप आणि लेट खरीप हंगामांतील कांदा लवकर खराब होतो. अशा स्थितीत शेतकऱ्यांना मिळेल त्या भावात कांदा विकण्याशिवाय पर्याय राहत नाही. त्यामुळे कांदा हे पीक शेतकऱ्यांसह सरकारपुढील समस्या बनली आहे. यावर पांढरा कांदा हा नामी उपाय ठरू शकतो. राहुरी कृषी विद्यापीठाने 'फुले सफेद' हे बियाणे १९९४ मध्येच विकसित केले आहे.

## पांढऱ्या कांद्याला मागणी

परदेशात कांद्याऐवजी त्याची पावडर अथवा कीस वापरला जातो. त्यामुळे कांद्यावर प्रक्रिया करून त्याची पावडर, कीस बनवणारे उद्योगही तेथे आहेत. पांढऱ्या कांद्यातील टीएसएस घटकामुळे पावडर किंवा कीस बनवण्यासाठी तो उपयुक्त आहे. त्यामुळे परदेशात पांढऱ्या कांद्याला सर्वाधिक मागणी आहे.



## पांढऱ्या कांद्याची वैशिष्ट्ये

- टीएसएसचे प्रमाण १३ टक्के
- तिखटपणा अधिक
- जास्त दिवस टिकतो
- लेट खरीप, रब्बी हंगामात येतो
- परदेशात चांगला दर



तिरपण : सर्वपक्षीय सत्कार समितीतर्फे खासदार राजू शेट्टी यांचा सत्कार करताना जी. आर. पाटील. सोबत अजित नरके, माजी आमदार सत्यजित पाटील आदी.

# 'दत्त आसुर्ले' सभासदांचाच ठेवू या

खासदार राजू शेट्टी : तिरपणमध्ये जिल्हा परिषद, पंचायत सदस्यांचा सत्कार

पुनाळ : श्री दत्त आसुर्ले–पोर्ले साखर कारखाना अवसायनात काढून विक्रीस काढण्याचा घातलेला घाट सर्वांनी मिळून उधळून लावून तो सभासदांच्याच मालकीचा ठेवू या, असे आवाहन खासदार राजू शेट्टी यांनी केले. तिरपण (ता. पन्हाळा) येथे शेतकरी संघटना व ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित परिसरातील जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांच्या सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सरपंच भैरू कुंभार होते. विक्रम पाटील यांनी स्वागत केले.

खासदार शेट्टी म्हणाले, ''बाहेरची शक्ती ज्या वेळी आपल्यावर आक्रमण करते तेव्हा त्यास तोडीस तोड उत्तर देणे गरजेचे आहे. संयमी पाऊल उचलूनही पदरी निराशा पडत असेल तर एकत्रित लढण्यावाचून पर्याय नाही.''

जिल्हा परिषदेचे बांधकाम आरोग्य सभापती सावकर मादनाईक म्हणाले, ''केवळ खासदार राजू शेट्टी यांच्यामुळे आपला विजय झाला. बांधकाम विभागामार्फत प्रत्येक गावात योजनांचा लाभ देण्यास प्रयत्नशील राहू.''

माजी आमदार सत्यजित पाटील म्हणाले, ''जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत खर्चाच्या बजेटनुसार तिकिटाचे वाटप झाले; पण राजू शेट्टी याला अपवाद राहिले. ऊसकरी शेतकऱ्यांच्या टनाला ६०० रुपयांचा फायदा केल्याचा पुरावा म्हणजे शेतकरी संघटनेचे खरे यश होय.'' महिला बालकल्याण सभापती भाग्यश्री गायकवाड, कुंभी बँकेचे अध्यक्ष अजित नरके, विक्रम पाटील, सरदार पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. सभापती संजय चावरेकर, उपसभापती सौ. सुवर्णा पाटील, लता साठे, भारती पाटील, पंचायत समिती शिरोळचे सभापती युनुस पटेल, करवीर पं. समितीचे सदस्य अर्जुन पाटील, योगीराज गायकवाड, विलास पाटील (कोपार्डे), प्रकाश पाटील (पोर्ले), सुजाता पाटील (कळे), हातकणंगलेचे माजी उपसभापती अरुण मगदूम यांचा ग्रामस्थांच्या हस्ते सत्कार झाला.

डी. जी. पाटील, एम. टी. पाटील, विकास पाटील, अण्णासाहेब गायकवाड, बाजीराव चौगले, गजानन पाटील, रामराव चेचर, बळिराम पाटील, आर. बी. पाटील, जी. आर. पाटील, भगवान पाटील, उपसरपंच, सदस्य, संघटनेचे शाखाध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते. विक्रम पाटील यांनी आभार मानले.

# पाण्याचा दुष्काळ व दुधाचा महापूर



कृषीमंत्रालयाच्या अखत्यारित असलेल्या पशुसंवर्धन विभागाच्या शिफारशीनुसार १८ फेब्रुवारी २०११ रोजी दूध पावडर व केसीन वर बंदी घालण्याची शिफारस केंद्राकडे केली. निर्यातीवर बंदी घातल्यामुळे देशात विशेषतः महाराष्ट्र, गुजरात कर्नाटक आणि आंध्रप्रदेश आदी राज्यात दूध उत्पादक शेतकऱ्यांवर फार मोठे संकट उभे ठाकले आहे. पशुसंवर्धन विभागाच्या शिफारशीनुसारच मंत्रीमंडळाने दूध पावडर व केसीनवर निर्यातबंदी लादल्यामुळे प्रत्येक राज्यामध्ये दुधाचे उत्पादन हे १० ते १५ टक्क्यांनी अतिरिक्त वाढले आहे.

देशामध्ये आज रोजी २५ हजार टन दूध पावडर निर्यातबंदी लावल्यामुळे पडून आहे. दूध पावडर ठेवायला गोदामे देखील कमी पडू लागले आहेत. त्यामुळे दूध पावडर निर्यात करणारे कारखाने देखील बंद आहेत. मुळातच दुधाची व दुग्धजन्य पदार्थांची देशाची गरज भागून जे दूध शिल्लक राहते, ते दूध सरळ पावडर व केसीन बनविण्यासाठी वापरले जाते. देशातील बाजारपेठेमध्ये दूध पावडर व केसीनची मागणी कमी असल्यामुळे त्यांची निर्मिती क़रण्याचे काम कंपन्यांनी थांबविलेले आहे. परिणामी महाराष्ट्रात २० लाख लिटर दूध शिल्लक राहू लागले आहे. दूध पावडर उत्पादन करणाऱ्या कंपन्याकडे निर्यातबंदीमुळे दूध पावडरीचे व केसीनचे साठे पडून असल्यामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या आहेत. त्यांनी दुधाचे संकलन थांबविल्यामुळे दुधाचे काय करायचे असा प्रश्न दूध उत्पादकांना पडलेला आहे. परिणामी दुधाचे दर पडलेले आहेत. त्यामुळे दुधावर उपजिविका करणारी कुटुंबियांचा आर्थिक डोलारा देखील कोलमोडून पडलेला आहे. एकीकडे राज्यात दुधाचा महापूर आला आहे. तर दुसरीकडे प्रचंड मोठा दुष्काळ पडलेला आहे. अशी विसंगती निर्माण झालेली आहे. दुग्ध व पशुसंवर्धन विभाग हा प्रामुख्याने नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड (एन. डी. डी. बी.) व मदर डेअरीच्या सरकारी अधिकाऱ्यांच्या इशाऱ्यावर आपले धोरण ठरवत असतात. ह्या भ्रष्ट अधिकाऱ्यांनी उत्तर भारतातील दुधाच्या खरेदीचे दर कमी करून विक्रीचे दर वाढविले, व आपल्या भ्रष्ट कारभारावर पांघरून घातले आहे. महाराष्ट्र, गुजरात कर्नाटक आणि आंध्रप्रदेशमधील संघटित दूध उत्पादकांनी दूध दर कमी करण्यास प्रखर विरोध केल्याने दर कमी करता आले नाहीत. पण दूध पावडर व केसीन निर्मिती थांबल्यामुळे त्यासाठी लागणारे दूध हे सरळ बाजारात आल्यामुळे हे अतिरिक्त दूध कमी दराने खरेदी करून मदर डेअरीने मात्र इथेही डल्ला मारला व परिणामी ४ राज्यांचे इथेही नुकसान झाले आहे. ज्या मंत्रालयाने दुधाच्या पावडरीवर निर्यातबंदी लादण्याची मागणी केली. तेच मंत्रालय दूध पावडर व केसीनवरील बंदी मागे घेण्याची शिफारस करण्यास टाळाटाळ करते आहे. वाणिज्य मंत्रालयाकडे विचारणा केली असता पशुसंवर्धन खात्याच्या मागणीनुसारच दूध पावडरवर बंदी घातलेली आहे. त्यामुळे त्यांच्याकडून मागणी झाल्याशिवाय आम्ही बंदी मागे घेण्याचा विचार देखील करणार नाही. असे सांगण्यात आले. ही बंदी मंत्रिगटाने घातलेली नसून मंत्रिमंडळाने घातलेली आहे. कृषीमंत्री शरद पवार यांच्याकडे पाठपुरावा करून देखील समाधानकारक उत्तर मिळालेले नाही. त्यांच्या मंत्रालयाने देखील उडवाउडवीची उत्तरे दिली. वास्तविक ही सर्व जबाबदारी पशुसंवर्धन खात्याची आहे. मात्र ते दुसऱ्याकडे बोट दाखवत आहेत. यामुळे देशातील दूध उत्पादक शेतकरी मोठ्या प्रमाणात भरडला जात आहे. विशेषतः महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक व आंध्रप्रदेश या चार राज्यांना मोठा फटका बसत आहे. देशातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना लाखो रूपयांचा फटका बसत आहे. महाराष्ट्रात विशेषतः विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील काही भाग दुष्काळामुळे होरपळला जात आहेत. त्यामुळे एकीकडे पाण्याचा दुष्काळ तर दुसरीकडे दुधाचा महापूर अशी विचित्र परिस्थिती निर्माण झालेली आहे. वाढत्या उन्हामुळे महाराष्ट्रात कधी नव्हे ती तीव्र चारा व पाणी टंचाई निर्माण झालेली आहे. पशुखाद्याचे दरही आकाशाला जाऊन भिडले आहेत. त्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांनी आपले दुधाळ जनावरे कत्तलखान्याकडे विकण्याचा सपाटा लावलेला आहे. ना. पवार साहेबांच्या अखत्यारितील अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाने मात्र कत्तलखाने चालविण्यासाठी अनुदान दिलेले आहेत. भारतातून म्हैस, रेडे, म्हशीचे वासरे यांचे मांस निर्यात होते, व या मांसाच्या निर्यातीलाही भरघोस अनुदान देण्याचा सपाटा चालवलेला आहे. त्यामुळे केंद्र सरकारने या अतिमहत्वाच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहून निर्यातबंदी उठविणे गरजेचे आहे. दूध पावडरीचे शिल्लक साठे निर्यात झाल्यास या उद्योगाला थोडाफार दिलासा मिळणार आहे. व भविष्यात दूध टंचाईचे संकट टळणार आहे

# अवैध बांधकाम प्रकरणी संजय पाटील-यड्रावकर यांच्यासह आठ नगरसेवकांना जिल्हाधिकाऱ्यांची चौकशी नोटीस

जयसिंगपूर(प्रतिनिधी): येथील जयसिंग महाराज उद्यान व लगतचा नगरपरिषदेचा रस्ता  यावरील अनधिकृत बांधकाम ाप्रकरणी माजी नगराध्यक्ष व विद्यमान नगरसेवक संजय पाटील – यड्रावकर यांच्यासह आठ विद्यमान नगरसेवकांना अपात्र का ठरवू नये, अशा आशयाची चौकशीची नोटीस अप्पर जिल्हाधिकारी आप्पासाहेब धुळाज यांनी पालिकेतील नगरसेवकांना लागू केल्याने सत्ताधाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

या प्रकरणी भाजपचे संजय वैद्य यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाद मागितली होती. मा. उच्च न्यायालयाने तक्रार वैध ठरवून २९ फेब्रुवारी १२ रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित नगरसेवकांच्या चौकशीचे आदेश दिले होते. या आदेशानुसारच यड्रावकर यांच्यासह रेखा देशमुख, शिवाजी कुंभार, अस्लम फरास, युनुस डांगे, चंद्रकांत खामकर, राजेंद्र नांद्रेकर, संभाजी मोरे या विद्यमान नगरसेवकांना महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ च्या कलम ४४ नुसार आपणास अपात्र का ठरविण्यात येऊ नये, याबाबत लेखी खुलासा सोमवारी दि. १६ एप्रिल रोजी द्यावा अशी नोटीस जिल्हाधिकाऱ्यांनी बजावली आहे. याबाबत स्वाभिमानी पक्षामार्फत पत्रकार परिषद घेण्यात आली. पत्रकार परिषदेमध्ये बोलताना याचिककर्ते संजय वैद्य म्हणाले की, उशीरा का होईना जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत दखल घेतल्याबद्दल समाधन व्यक्त करून यानंतर संबंधितावर त्वरीत कारवाई करतील. तसेच दोषी नगरसेवकांना अपात्र ठरवीत असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. स्वाभिमानीचे माजी नगरसेवक डॉ. महावीर अक्कोळे यांनी सार्वजनिक बागेतील अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम याबाबतीतले कायदे एवढे स्पष्ट व पारदर्शक आहेत की जिल्हाधिकारी यांना चौकशीनंतर कारवाई करावीच लागणार आहे. तसेच आमचा खोकीधारकांना अजिबात विरोध नाही, पण स्वतःला जयसिंगपूरचे मालक समजून कायदे धाब्यावर बसवून अनधिकृत बांधकामाची मनमानी करणाऱ्यांना आमचा विरोध आहे. सदर पत्रकार बैठकीस सुनील शर्मा, कुमार पाटील, राजू नरदे, शैलेंद्र गाडे, श्रीप्रसाद कुलकर्णी, सुभाष शेट्टी, राजू दांईगडे, शैलेश चौगुले, सागर मादनाईक, आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'स्वाभिमानी'च्या उन्हाळी शिबीराला उत्स्फुर्त प्रतिसाद

जयसिंगपूर (प्रतिनिधी) : येथे स्वाभिमानी प्रतिष्ठान व स्वाभिमानी महिला आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या उन्हाळी शिबीराला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. दि. १६ ते २२ एप्रिल दरम्यान येथील इंडियन मेडिकल असोशिएशनच्या हॉलमध्ये हे शिबिर घेण्यात आले.

विद्यार्थीनींना खास पर्वणीच या उन्हाळी शिबिरामध्ये लाभली गेली.  या शिबिरामध्ये व्यक्तीमत्व विकासाबरोबरच शीत पेय, चौपाटी पदार्थ, यम्ब्रॉडरी, पेटिंग, कापडी बॅग्ज व हेअर स्टाईल आदी उपक्रम घेण्यात आले. नूतन जिल्हा परिषद सदस्या सौ. निता परिट यांच्या मार्फत शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. तर शिबीरामध्ये सौ. दिपाली सदाफुले यांनी मार्गदर्शन केले. तसेच व्यक्तीमत्व विकासावर राज कदम यांचे व्याख्यान झाले. शिबीराचे संयोजन सौ. उज्वला शेट्टी, सौ. स्वाती मादनाईक, सौ. भारती पाटील, सौ.  अरूणा पाटील, सौ. मनिषा नेजकर, व वैशाली मोरे यांनी केले होते. यावेळी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष हिंदूराव चौगुले, बांधकाम व आरोग्य सभापती सावकर मादनाईक, भरत बँकेचे अध्यक्ष  विठ्ठल मोरे, सुभाष शेट्टी, डॉ. सौ. सुनेत्रा पाटील, डॉ. किरण पाटील, पंचायत समिती सदस्य श्रीमती अनंतमती पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# दूध पावडर व केसीन वरील निर्यात बंदी उठवा

जयसिंगपूर (प्रतिनिधी) : केंद्र सरकारने दूध पावडर व केसीन वरील लावलेली निर्यात बंदी त्वरीत उठवावी, अशी मागणी खासदार राजू शेट्टी यांनी काँग्रेस अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांच्याकडे केली. केंद्राने दूध पावडरीवर निर्यात बंदी लावलेली आहे. त्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. याकडे लक्ष वेधत आज स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनी काँग्रेस अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधीची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

दूध वापडर वर निर्यात बंदी लावल्यामुळे देशात अतिरिक्त दूध शिल्लक राहू लागले आहे. त्यामुळे दूध उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडलेला आहे. हे निदर्शनास आणून दिले. यावेळी खासदार राजू शेट्टी यांनी निवेदन दिले. यामध्ये म्हटले आहे की, केंद्र सरकारने दूध वापडर व केसीनच्या निर्यातीवर फेब्रुवारी ११ पासून बंदी घातल्यामुळे देशात विशेषतः महाराष्ट्रात दूध उत्पादक शेतकऱ्यांवर फार मोठरे संकट उभे ठाकले आहे. मुळातच दुधाची व दुग्धजन्य पदार्थाची देशाची गरज भागून जे दूध शिल्लक राहते. ते दूध सरळ पावडर व केसीन बनविण्यासाठी जाते. दूध पावडर व केसीनची गरज आपल्याला कमी असल्यामुळे दूध पावडर व केसीन निर्माण करण्याचे काम कंपन्यांनी थांबविलेले आहे. परिणामी महाराष्ट्रात २ लाख लीटर दूध शिल्लक राहू लागले आहे. दूध पावडर उत्पादन करणाऱ्या कंपन्याकडे निर्यातंबदीमुळे पावडरीचे साठे पडून असल्यामुळे अनेक सरकारी व खासगी कंपन्या आर्थिक संकटात सापडलेल्या आहेत. त्यांनी दुधाचे संकलन थांबविल्यामुळे दुधाचे काय करायचे असा प्रश्न दूध उत्पादकांना पडलेला आहे. परिणामी दुधाचे दर पडलेले आहेत. त्यामुळे दुधावर उपजिविका करणारी कुंटुंबियांचा आर्थिक डोलारा कोलमडलेला आहे. त्यातच वाढत्या उन्हामुळे महाराष्ट्रात तीव्र चारा व पाणी टंचाई निर्माण झालेली आहे. पशुखाद्याचे दरही भरमसाठ वाढलेले आहेत. त्यामुळे दूध उत्पादकांनी आपले जनावरे कत्तलखान्याकडे विकण्याचा सपाटा लावलेला आहे. त्यामुळे केंद्र सरकारने या महत्वाच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहून निर्यातबंदी उठविणे गरजेचे आहे. दूध पावडरीचे शिल्लक साठे निर्यात झाल्यास या उद्योगाला थोडाफार दिलासा मिळणार आहे. व भविष्यात दूध टंचाईचे संकट टळणार आहे. तसेच कांदा व बेदाणा उत्पादकही अत्यंत मेठाकुटीस आलेला आहे. त्यांचाही माल मातीमोल भावाने विकला जात आहे. उत्पादक शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरलेला आहे. आपण तातडीने याप्रश्नी लक्ष घालून केंद्र सरकारला निर्यातबंदी मागे घेण्यास सांगावे. असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी नाफाचे सचिव अनिल सिंग उपस्थित होते.



**उपोषण हेच आमचं प्रमुख शस्त्र असलं तरी या शस्त्रावर विश्वास न ठेवणारी नवी सशस्त्र सेना आम्ही तयार करणार आहोत!!**

# गूळ आणि काकवीचे आहारातील महत्त्व



शेती उत्पादनामचे जागतिकीकरणामुळे आज ४४ देशांत गुळाची निर्यात होते. गुळ आणि काकवी केवळ गोडीसाठी वापरले जाणारे पदार्थ नसून, आहारातील महत्वाचे, पचनास हलके, पौष्टीक अन्नघटक आहेत. गुळामध्ये कॅल्शिअम, लोहा, तांबे, स्फुरद आदी खनिजे काही प्रमाणात प्रथिने, स्निग्ध पदार्थ, तसेच जीवनसत्वे आहेत. आपल्या पूर्वजनांना गुळाचे औषधी महत्व माहीत होते. आणि अनेक रोगावर गुळाचा औषधासारखा उपयोग केला जातो. गुळामुळे लघवी साफ होते. गळा साफ राहतो. गुळ हृदयाच्या पेशींना शक्तीवर्धक म्हणून काम करतो. काविळ आणि पंडूरोग झालेल्यांना गुळाचा औषधासारखा उपयोग केला जातो. आर्युविदिक औषध निर्मिती, सौंदर्य प्रसाधन निर्मिती, बेकरी मालाचे उत्पादन आदी ठिकाणी गुळाचा आणि काकवीचा वापर केला जातो. आपल्या शरीराच्या निकोप वाढीसाठी गुळ आणि काकवी आहारात नित्य वापर करणे गरजेचे आहे. पण यासाठी गुळ आणि काकवी तेवढीच दर्जेदार आणि रासायनिक पदार्थ विरहित असणे महत्वाचे आहे.

गुळाचा दर्जा उत्तम प्रतिचा बनविण्यासाठी उसाच्या प्रतिवर व गुळावरील प्रक्रियेवर अवलंबून असतो. गुळ तयार करण्याच्या गुन्हाळात सुमारे १२०० लिटर उसाचा रस मावेल असी मोठी लोंखडी काईल असते. त्यात ११०० लिटर सर घेतात. त्याचा सामू ५.५ असतो त्यातील नत्र काढण्यासाठी त्यामधील नत्र काढण्यासाठी त्यामध्ये १.५ किलो चुना मिसळतात. पीएच ६.५ पर्यंत येईतोपर्यंत त्यात चुना मिसळला जातो. ते द्रावण उकळल्यानंतर मळी घट्ट होण्यासाठी त्यात १ ते १.५ किलो भेंडीचा रस घातला जातो. यानंतर ब्लिचिंग एजंट म्हणून किंवा गुळाला आकर्षक पिवळा रंग येण्यासाठी हायड्रस पावडर टाकली जाते. ही पावडर म्हणजे सल्फर डायऑक्साईड होय. हायड्रसमध्ये थोडे आर्सेनकिचेही प्रमाण असते. त्यामुळे त्याचा अतिवापर शरीरास धोकादायक असतो, तरीपण ग्राहकांना पिवळा किंवा सोनेरी रंगाचे गूळ आवडत असल्यामुळे ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी अनेक जण गूळ बनवतात. हायड्रसची पावडर अधिक प्रमाणात वापरतात. खरे पाहिले तर हायड्रस न वापरताही गूळ बनविता येतो. पण त्या गुळाचा रंग तपकिरी सारखा होतो. ग्राहक बाजारात हा गूळ चांगला नाही म्हणून नाकारतात आणि त्याला दर मिळत नाही. म्हणून शेतकऱ्यांना हायड्रस वापरण्यासाठी भाग पडतो. रस तापविल्यानंतर हे द्रावण साधारण १०५ अंश तापमानाला काकवी तयार होते. आणि ११६ अंश तापमानाला गूळ तयार होते. हायड्रसचे प्रमाण जास्त असल्यास काही काळानंतर हा गूळ ओलसर बनतो व त्याचा रंगही बदलतो. त्यामुळे शेतकरी हा गूळ लगेच विकण्यास आतूर असतात. कोल्हापूर मार्केट गुळाच्या व्यापारासाठी अग्रेसर आहे. व राज्यातील जवळपास ४० टक्के गुळाचा व्यापार येथेच होते. तरी शेतकऱ्यांना उत्तम तऱ्हेचे गूळ आणि काकवी तयार करून चांगला पैसा मिळविणे शक्य आहे. तरी याचा फायदा घ्यावा.



पिक-पाणी

डॉ. जिनेंद्र धनपाल चौगुले
प्लॉट नं. २९, चंद्रप्रभ, माहेर हॉस्पिटलजवळ नांदणी रोड, जयसिंगपूर. येथे संपर्क साधावा. फोन २२४५१९. मो. ९९२२७७२८१५

# ‘कृषी मूल्य’कडून शेतीमालाच्या किमती वाढविण्याच्या शिफारशी!

पुणे : शेतीमालाच्या आधारभूत किमतीविषयीचा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा आवाज अखेर कृषी मूल्य आयोगाने मान्य केला आहे. २०१२-१३ या खरीप हंगामासाठीच्या शेतीमालाच्या किमतीत २५ ते ४० टक्क्यांपर्यंत वाढ करण्याची शिफारस आयोगाने केल्याची माहिती समोर आली असून, देशभरातील शेतकऱ्यांचे आता केंद्र सरकारच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे. आजही हे दर पुरेसे समाधानकारक नसले, तरी २००९ चा अपवाद वगळता स्वातंत्र्योत्तर एकाच हंगामात सर्वच पिकांत एकाच वेळी करण्यात आलेली ही सर्वांत मोठी शिफारस मानली जात आहे.

दरम्यान, केंद्रीय कृषी मूल्य आयोगाने केंद्र सरकारला केलेल्या शिफारशींचा गंभीरपूर्वक विचार करण्यात यावा, या मागणीसाठी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांना भेटणार असल्याचे माहिती आहे.

केंद्र सरकारकडून शेतीमालाच्या हंगामनिहाय जाहीर होणाऱ्या किमती उत्पादन खर्चालाही धरून नाहीत. त्या अव्यवहार्य आणि अन्यायकारक असल्याच्या तक्रारी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी आमदार पाशा पटेल यांच्या नेतृत्वाखाली कृषी मूल्य आयोगापुढे केल्या होत्या. मुंबईत १७ फेब्रुवारीत दौऱ्यावर आलेल्या आयोगाचे अध्यक्ष डॉ. अशोक गुलाटी यांनी ‘शेतीमालाला उत्पादन खर्चानुसार दर देणे अशक्य’ अशी स्पष्टोक्ती करून वाद ओढवून घेतला होता. ‘ॲग्रोवन’ने डॉ. गुलाटी यांच्या भूमिकेविरोधात घेतलेल्या भूमिकेने आणि प्रतिक्रियांनी महाराष्ट्र ढवळून निघाला. मुंबईनंतर दिल्ली येथे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी थेट चर्चेचे आवाहन डॉ. गुलाटी यांना केले, तसेच त्यांना महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येण्याचे निमंत्रणही दिले. अखेर १२ व १३ मार्च रोजी डॉ. गुलाटी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ १२ व १३ मार्च रोजी महाराष्ट्र (लोदगा, जि. लातूर) दौऱ्यावर आले. याप्रसंगी कृषी मूल्य आयोगासमोर राज्यभरातील शेतकऱ्यांनी पीकनिहाय उत्पादन खर्चाचे सादरीकरण केले होते.

शेतकऱ्यांच्या सादरीकरण आणि रोषाला सामोरे गेल्यानंतर अखेर डॉ. गुलाटी यांनी, ‘शेतकऱ्याला अडचणीत ठेवून अन्न सुरक्षा साधणे अशक्य आहे’ असे जाहीर केले. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या अभ्यासपूर्ण सादरीकरणामुळे कृषी मूल्य आयोगाला याची अखेर दखल घ्यावी लागली. २०१२-१३ या खरीप हंगामाकरिताच्या नऊ पिकांसाठीच्या आधारभूत किमतीत २५ ते ४० टक्क्यांपर्यंत वाढीच्या शिफारशी केंद्र सरकारकडे कृषी मूल्य आयोगाने करून शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. यापूर्वी २००९ मध्ये लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ३० ते ५० टक्के वाढ करण्यात आली होती. मात्र यानंतर दोन वर्ष कापसाच्या दरात वाढ केली गेली नाही. गेल्या वर्षी केवळ २०० रुपये वाढ करण्यात आली होती.

या दरम्यान, राज्य शेतीमाल समितीच्या सदोष व्यवस्थेलाही आव्हान देण्यात आले. परिणामी, राज्य सरकारने राज्यस्तरीय शेतीमाल समिती बरखास्त करून नव्या रचनेची नुकतीच घोषणा केली. शेतीमाल उत्पादन खर्च काढण्याच्या प□तीला अगदी कृषी वि□पीठे, राज्य शेतीमाल समितीतील दोष आमदार पाशा पटेल यांनी सरकारच्या निदर्शनास आणून दिले होते.

शा□ीय प□तीने लढल्यास यश नक्की मिळते. कृषी मूल्य आयोगाने आधारभूत किमतीत ४० टक्क्यांपर्यंत वाढीच्या शिफारशी या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा विजय आहे. लोदगासारख्या लहानशा खेड□त देशाच्या कृषी मूल्य आयोग येतो अन□राज्यातील शेतकरी त्यांच्या पुढे व्यवहार्य सादरीकरण करतात. आमच्या अभ्यासला, भूमिकेला आणि त्यामागील कष्टाला डॉ. गुलाटी आणि त्यांच्या शिष्टमंडळाने समजून घेतले, अन□तसा प्रयत्न नव्या शिफारशींमध्ये केला, ही बाब स्वागतार्ह आहेत. हा ऐतिहासिक दिन आहे. मुख्यमंत्र्यांनीसु□ यास सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. आम्ही लवकरच डॉ. गुलाटी यांना भेटणार आहोत.

– पाशा पटेल, सदस्य, विधान परिषद

## कांद्यासाठी विधानभवनाच्या दारात !



विधानभवन, मुंबई : विधानभवनासमोर स्वाभिमानी शेतकरी संघटनेने कांदा, बेदाणा आणि दुधाकरिता 'मोफत विक्री' आंदोलन काल (बुधवारी) केले. यावेळी पोलिसांबरोबर झालेल्या झटापटीत कांदा, बेदाणा आणि दूध सांडले.

## कांद्यासाठी विधानभवनाच्या दारात !



विधानभवन, मुंबई : खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने शेतकऱ्यांनी विधिमंडळाच्या प्रवेशद्वारावर आंदोलन केले. या वेळी मोफ् त वाटण्यासाठी आणलेले कांदे, बेदाणे आणि दूध पोलिसांच्या झटापटीत सांडले.